**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३० वा | दिनांक : १७/१०/२०२४ | वार : गुरूवार


# काँग्रेसच्या स्क्रिनिंग कमिटीची दिल्लीत बैठक

## १२५ उमेदवारांच्या नावावर चर्चा, आज उमेदवारांची यादी जाहीर होणार?



**दिल्ली** : निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. राज्यातील २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. या घोषणेने राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. यातच महाविकास आघाडीत २२० जागांवर एकमत झाले आहे.

तिन्ही पक्ष यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सध्या या जागांवर उमेदवार निवडीची प्रक्रिया पुढे नेत आहेत.

उर्वरित जागांवर महाविकास आघाडीच्या पक्षांमध्ये लवकरच एकमत होणार असल्याचे नेते सांगत आहेत. तर दुसरीकडे उमेदवार निवडीसाठी काँग्रेसच्या स्क्रीनिंग कमिटीची बैठक दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना जवळपास समसमान जागांवर निवडणूक लढवणार आहेत. काँग्रेस एकटी १०५ ते ११० जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

उमेदवारांची यादी लवकरच पाठवली जाईल

महाराष्ट्रात महाविकास आघाडीला पाठिंब्याची लाट असल्याचा काँग्रेसचा दावा आहे. राज्याला एनडीएपासून वाचवण्याचा अजेंडा घेऊन एमव्हीए निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे नेते नसीम खान म्हणाले की, काँग्रेसकडे सर्व जागांवर तगडे उमेदवार आहेत. लवकरच उमेदवारांची यादी काँग्रेस निवडणूक समितीकडे पाठवली जाणार आहे.

प्रचारासाठी कमी वेळ

निवडणुकीच्या तारखांच्या घोषणेवर विरोधकांनीही प्रतिक्रिया दिली आहे. विधानसभा निवडणूक प्रक्रिया ३५ दिवसांत पूर्ण करण्याची घोषणा निवडणूक आयोगाने केली असल्याचे विरोधकांनी सांगितले. उत्तर प्रदेश नंतर महाराष्ट्र विधानसभा सर्वात मोठी आहे. असे असतानाही एकाच टप्प्यात निवडणुका होत आहेत. यंदा राज्यात ५ टप्प्यात लोकसभा निवडणुका झाल्या होत्या. काँग्रेस नेते तथा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, निवडणूक आयोग राजकीय पक्षांना उमेदवार ठरवण्यासाठी, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आणि प्रचारासाठी सुमारे ४० दिवसांचा अवधी देतो. पण, यावेळी आम्हाला ३५ दिवस मिळाले आहेत. यामुळे आम्हाला प्रचारासाठी कमी वेळ मिळेल. विरोधकांना कमी वेळ देण्यासाठी नियोजनाचा हाही भाग असू शकतो.

१२५ उमेदवारांच्या नावावर चर्चा- १७ ऑक्टोबरला यादी?

उमेदवार निवडीसाठी काँग्रेसच्या स्क्रीनिंग कमिटीची आज सायंकाळी ५ वाजता दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात बैठक होणार आहे. यात १२५ उमेदवारांच्या नावावर बैठकीत चर्चेची शक्यता वर्तवण्यात येत आहे. १७ ऑक्टोबरला काँग्रेस उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यताही सूत्रांनी वर्तवली आहे. काल विजय वडेट्टीवारांच्या बंगल्यावर काँग्रेसची बैठक झाली. यातही काँग्रेसकडून १२५ उमेदवारांच्या नावांची चाचपणी घेण्यात आली होती.

# १००, २०० चा स्टॅम्प व्यवहारातून झाले बाद

**मुंबई** : सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा खड्डा पडणार आहे. १०० रुपयांच्या कामासाठी आता ४०० रुपये अधिक मोजावे लागणार आहेत. कारण शासनाकडून आजपासून शंभर आणि दोनशे रुपयांचा मुद्रांक (स्टॅम्प) बंद करण्यात येणार आहे. यामुळे आता सर्वसामान्यांना पाचशे रुपयांच्या मुद्रांकावर सर्व व्यवहार करावे लागणार आहे. किरकोळ गोष्टीसाठी सुद्धा आता पाचशे रुपयांच्या मुद्रांक घेऊन व्यवहार करावे लागणार आहे. यामुळे सामान्यांच्या खिशाला मोठी झळ बसणार आहे.

विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी सरकारने लाडकी बहीण योजना राबवण्यात आली. लाभार्थी महिलांच्या खात्यात योजनेचे पैसेही टाकले आहेत. यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर मोठा बोजा पडला. हो बोजा भरुन काढण्यासाठी सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागणार आहे. सरकारचा महसूल वाढावा यासाठी राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.

कोणत्याही कामासाठी ५०० चा स्टॅम्प लागणार प्रतिज्ञापत्र, भाडे करार, विविध कर्ज प्रकरणासाठी लागणारी प्रतिज्ञापत्रे, शैक्षणिक कामांसाठी लागणारे प्रतिज्ञापत्रे, संचकारपत्र, विक्री करार अशी कामे शंभर रुपयांच्या स्टॅम्पवर केली जात होती. मात्र आता त्याच कामासाठी चारशे रुपये अधिक मोजावे लागणार आहेत. हक्क सोडपत्रासाठी दोनशे रुपयांचा स्टॅम्प वापरला जातो. आता त्यासाठी सुद्धा तीनशे रुपये अधिक मोजावे लागणार आहेत. १०० आणि २०० रुपयांच्या स्टॅम्पवर होणाऱ्या कामांसाठी आता ५०० रुपयांचा स्टॅम्प खरेदी करावा लागणार आहे. त्यामुळे लाडक्या बहिणीला पैसे दिल्यानंतर आता आपल्या खिशातून किती जाणार असा प्रश्न सर्वसामान्यांमधून उपस्थित होत आहे.

सरकारी दस्तावेज, साधी नोटरी, बँकेतून कर्ज घ्यायचं असल्यास तहसील किंवा महसूल कार्यालयात अवघ्या शंभर, दोनशे रुपयांत स्टॅम्प पेपर केला जात होता तो आता इतिहासजमा होणार आहे. आता ५०० रुपयांच्या स्टॅम्पवरच खरेदी, नोटरी, हक्क किंवा प्रतिज्ञापत्र दिले जाणार आहे.

# पक्षाकडून संधी नाही मिळाल्यास अपक्ष लढणार - गायत्री शिंगणे



**बुलढाणा** : सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते राजेंद्र शिंगणे हे शरद पवारांच्या पक्षात परत जाणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. यातच राजेंद्र शिंगणे यांची पुतणी गायत्री शिंगणे बंडखोरीच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही, तर अपक्ष लढणार, अशी भूमिका गायत्री शिंगणे यांनी घेतली आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारीवर बोलताना गायत्री शिंगणे म्हणाल्या, मला असे वाटत आहे की पवार साहेबांनी अजूनही ग्रीन सिग्नल दिलेला नाही. आम्ही एकनिष्ठतेने पवार साहेबांसोबत आहोत. त्यांनी सांगितले आहे की एकनिष्ठांना संधी देऊ. पण जर काही घडामोडी घडल्या, तरी मी लढेल. शंभर टक्के आम्ही लढणारच आहोत. एवढे कष्ट करून आम्ही घरोघरी तुतारी पोहोचवण्याचे काम मी केले आहे.

पण उलट्या-सुलट्या घडामोडी झाल्या तरी मी ठाम आहे. शंभर टक्के निवडणूक लढवणारच, अशी स्पष्ट भूमिका गायत्री शिंगणे यांनी घेतली आहे.

पुढे बोलताना गायत्री शिंगणे म्हणाल्या, पक्षाकडून संधी नाही मिळाली तर शंभर टक्के अपक्ष लढणारच. राजेंद्र शिंगणे यांच्या प्रवेशाला आणि उमेदवारीला विरोध आहे. कारण गेल्या पाच वर्षांपासून मी काम करत आहे. पक्ष फुटल्यानंतरही एकनिष्ठेने काम केले. बुलढाणा जिल्ह्यात राष्ट्रवादीचे हाल सर्वांनाच माहीत आहेत, असे मत व्यक्त करत गायत्री शिंगणे यांनी आपली भूमिका ठामपणे मांडली आहे.

राजेंद्र शिंगणे यांच्या परतीच्या चर्चेवर बोलताना गायत्री शिंगणे म्हणाल्या, अशा अफवा अनेक दिवसांपासून सुरू आहेत, की त्यांनी घरवापसीचे संकेत दिले आहेत. कालच्या सभेतही ते म्हणाले की १६-१७ तारखेला प्रवेश करणार. मात्र, आम्ही शरद पवार यांच्यावर विश्वास ठेऊन आहोत.

# अल्पवयीन मुलीवर बापाकडूनच अत्याचार

**हिंगोली** : सेनगाव तालुक्यातील गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधम बापावर गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मुलीच्या भावामुळे घटना उघडकीला आली असून पोलिसांनी मुलीच्या बापास बुधवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावातील अल्पवयीन मुलीचे आई, आजी, आजोबा व भाऊ मंगळवारी दुपारी शेतात कामासाठी गेले होते. दुपारी मुलगी शाळेतून आल्यानंतर घरी झोपली होती. यावेळी त्या मुलीचे वडिल घरी आले. त्याने मुलगी घरी एकटीच असल्याचा गैरफायदा घेत तिला बळजबरीने ओढून दुसऱ्या खोलीमध्ये नेले तसेच तिला धमकी देऊन तिच्यावर अत्याचार केला.

दरम्यान, याचवेळी तिचा भाऊ शेतातून घरी आल्यामुळे मुलगी रडतच भावाजवळ गेली. त्यानंतर तिच्या भावाने ११२ क्रमांकावर संपर्क केला. माझ्या वडिलांनीच बहिणीवर अत्याचार केला असून तो पळून जात असल्याचा संदेश त्याने दिला. या प्रकाराची माहिती मिळताच गोरेगाव पोलिस ठाण्याचे निरीक्षक शामकुमार डोंगरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद झळके, उपनिरीक्षक नितेश लेनगुळे, जमादार राहूल मैंदकर, सोपान रणखांबे, विठ्ठल खोकले, अनिल भारती यांच्या पथकाने तातडीने गावात जाऊन पाहणी केली.

# झाडबुके महाविद्यालयात डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन



**बार्शी** : श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व मराठी विभागाच्या विद्यमाने वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त "एक तास वाचनाचा" या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम झाला. उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी ग्रंथालयात जाऊन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यावरील पुस्तकांचे वाचन केले. ज्यामुळे वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवले गेले.

मराठी विभाग प्रमुख प्रास्ताविकात डॉ. नवनाथ दणाणे म्हणाले, वाचन जीवन संघर्षात दिशा दाखवणारे असते आणि पुस्तके दीपस्तंभासारखे कार्य करतात. हिंदी विभागाचे डॉ. गिरीश काशीद यांनी देखील वाचनाच्या महत्त्वाबद्दल आपले विचार मांडले. त्यांनी विद्यार्थ्यांना सफदर हाश्मी यांच्या कवितांची ओळख करून दिली तसेच ज्ञानेन्द्रपती यांच्या "मानवतेचा कणा" या पुस्तकावर आधारित कविता सादर केली. त्यांच्या सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांनी वाचनाचा व्यापक दृष्टिकोन कसा विकसित करावा हे समजून घेतले.अध्यक्षीय समारोप राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. विजयसिंह काळेपाटील यांनी केला. आपल्या भाषणात त्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना त्यांचे आदर्श कसे बनवावेत, याबद्दल मार्गदर्शन केले.

डॉ. विशाल लिंगायत यांनी सूत्रसंचालन केले. आयोजन ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. ए. ए. जेवळीकर व मराठी विभाग यांच्या वतीने करण्यात आले. या वेळी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ ऑक्टोबर २०२४


## शिवछत्रपती महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा



**पाचोड :** पैठण तालुक्यातील पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयात मंगळवारी वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्ताने सर्वत्र वाचन प्रेरणा दिन साजरा केला जात असतो. त्या पार्श्वभूमीवर पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयात मंगळवारी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला आहे.

प्रारंभी प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेकी वापर टाळून ग्रंथालयामध्ये येऊन जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन करावे, अध्ययन करावे आणि निर्भयपणे परीक्षेला सामोरे जावे तसेच चांगले वाचन साहित्य वाचल्याने आपले विचार आचार चांगले राहतात आणि पर्यायाने समाजाचे पाऊल पुढे पडते, असेही डॉ. चंद्रसेन कोठावळे म्हणाले.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य , प्राध्यापक , कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी एक तास सामूहिकपणे पुस्तकाचे वाचन केले आहे कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. हरिप्रसाद बिडवे यांनी केले तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली आहे.

यावेळी कार्यक्रमाला माजी प्राचार्य डॉ. सुरेश नलावडे, प्राचार्य अप्पासाहेब नेमाने, उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ.संतोष चव्हाण, डॉ. तुकाराम गावंडे, डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. भगवान जायभाये, प्रा. सचिन कदम, प्रा. विनोद कांबळे, डॉ. विठ्ठल देखणे, प्रा. ज्ञानेश्वर बेतुळे सर्वश्री सतीश वाघ, गजानन इंगळे, वैभव राऊत शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने हजर होते.

## सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने बेघर कुटुंबांना स्वतःचे घर भेटण्यासाठी उपायुक्त यांना निवेदन



**अहमदनगर :** सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने उपायुक्त यांना निवेदन. बेघर कुटुंबाला स्वतःचे घर भेटण्यासाठी महानगरपालिकेवर मोर्चा. बोल्हेगाव गावठाण येथील सर्वे नं.८७/१अ. क्षेत्र शासनाची असून मनपाने घेऊन रमाई आवास योजनेसाठी मिळावी-

मौजे बोल्हेगाव गावठाण येथील सर्वे नं.८७/१अ. पैकी क्षेत्र २ हेक्टर ५ आर ही जागा महाराष्ट्र शासनाची असून ती शासनाच्या ताब्यातच आहे. ती जागा मनपा ने घ्यावी व ती जागा पडिक असून मागासवर्गीय व अनुसूचित जाती जमातीचे ५० कुटुंब गांधीनगर बोल्हेगाव गावठाण येथे सुमारे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्त्वावर रहिवास करत आहे.

त्यामुळे या जागेवर गोरगरिबांच्या घरकुल योजनेअंतर्गत रमाई आवास योजनेसाठी उपयोगात घेऊन योजना राबवण्याची मागणी मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने निवेदन देऊन करण्यात आली यावेळी फाउंडेशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे समवेत कर्मा वावरे, बाळासाहेब साठे, चंद्रभागा लोखंडे, अतुल काते, आशा शेंडगे, जया मोकळ, सुमन शेवाळे, आशा पिंगळे, अलका पाटील, वैशाली शिरसाट, आशा पनरे, रूपाली वाल्हेकर, सुवर्णा ब्राह्मणे, उषा बुडखुडे, परसराम वाघमारे, रेणुका शिंदे, अनिता साबळे, सरस्वती साठे, जगन्नाथ भोसले, संगीता गुंजाळ, अर्चना ओहोळ, अनिता कुऱ्हाडे, मंगल शिंदे, सविता आव्हाड, बबई ससाने, अनिता वाघमारे, निवृत्ती पिंगळे, आशा काते, राणी दिवटे, लक्ष्मी भालेराव, विशाल सावे, वनिता बाराहाते, प्रशांत लोंढे, सतीश लोखंडे, मंगल आढागळे, अनिता लोखंडे, अनिता थोरात, पायल लोखंडे, अशोक वाघमारे, वनिता बाराते आदीसह बेघर कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, गांधीनगर बोलेगाव गावठाण येथे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्त्वावर राहत असून हे कुटुंब बेरोजगार आहे. त्यामधील काही कुटुंबातील व्यक्ती हे भंगार गोळा करतात मजुरीचे काम करतात हमालीचे काम करतात असे वेगवेगळ्या प्रकारे आपले उपजीविका चालवीत आहे.

परंतु त्यांना राहण्यासाठी स्वतःचे घर नसून हे भाड्याच्या घरात राहून भाडे भरावे लागतात तरी त्यांच्या उपजीविकेत पैसे कधी मिळतात तर कधी मिळत नाही अशा त्यांना भाडे भरणे परवडत नाही तरी बोल्हेगाव गांधीनगर येथे महाराष्ट्र शासनाच्या नावे असलेली पडीक जागा सुमारे १ एकर रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, यशवंत आवास योजना राबवण्यासाठी घरकुल साठी मिळावी त्यामुळे गोरगरीब जनता ही घराचे भाडे न भरता स्वतःच्या घरात जाणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## राष्ट्रीय समाज पक्ष विधान सभा निवडणूक स्वबळावर लढवणार - महादेव जानकर



**मुंबई :** विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर महायुतीला मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्या रुपाने महायुतीमधून पहिला मित्रपक्ष बाहेर पडला आहे. महायुतीमधून बाहेर पडल्यानंतर महादेव जानकर यांचा पक्ष स्वबळावर विधानसभा निवडणूक लढवणार आहेत. जातीय समीकरणांचा विचार करता भाजपला महादेव जानकर यांची मनधरणी करण्यात यश येते का? ते पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून महादेव जानकर महायुतीमध्ये नाराज असल्याची चर्चा होती. आमदारकीची टर्म पुन्हा न मिळाल्यामुळे देखील नाराज असल्याचे बोलले जात होते. याशिवाय जानकर यांनी आपल्या पक्षासाठी महायुतीकडे ४० ते ५० जागांची मागणी केली होती. मात्र त्यांना महायुतीकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे त्यांनी महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीला रामराम ठोकल्यानंतर महादेव जानकर यांचा पक्ष किती जागांवर उमेदवार उभे करणार तसेच भाजप आणि महायुतीकडून त्यांची नाराजी दूर केली जाणार की नाही, हे पहावे लागणार आहे.

लोकसभेला झाला होता पराभव लोकसभा निवडणुकीतही महायुतीने महादेव जानकर यांना एक जागा सोडली होती. जानकर यांनी राष्ट्रवादीच्या कोट्यातून परभणी मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली होती. मात्र त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. लोकसभा निवडणुकीवेळीही महादेव जानकर महाविकासआघाडीसोबत जायच्या तयारीत होते, यासाठी त्यांची शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत चर्चाही सुरू होती, पण शेवटच्या क्षणी महादेव जानकर यांनी महायुतीसोबत जायचा निर्णय घेतला होता.

जानकरांची मोठी ताकद महादेव जानकर यांना धनगर समाजाचा मोठा पाठिंबा आहे. महादेव जानकर यांच्या पक्षाची सोलापूर, बारामती, परभणी, बीड, जालना आणि कर्नाटक लगतच्या प्रदेशात मोठी ताकद आहे. धनगर समाजाची संख्या जास्त असलेल्या मतदारसंघात महादेव जानकरांच्या पक्षाला चांगला पाठिंबा आहे. त्यामुळे जानकर यांनी महायुतीला सोडचिठ्ठी देणे हे महायुतीसाठी डोकेदुखी ठरु शकतो.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)

विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ ऑक्टोबर २०२४


## मी मुस्लिम बांधवांशी बोललो असेन तर राजकीय संन्यास घेईन - उदय सामंत



**रत्नागिरी :** दसऱ्याच्या आदल्या दिवशी कणकवलीमध्ये हिंदू-मुस्लिम समाजामध्ये तणाव झाला होता. विजयादशमीनिमित्त आरएसएसच्या वतीने काढण्यात आलेले पथसंचलन काही समाज कंटकांनी अडवण्याचा प्रयत्न केला होता. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण झाले होते. यावर उद्योग मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकारानंतर मी किंवा माझा सीडीआर कोणत्याही मुस्लिम बांधवाशी बोलण्याबाबत सापडला, तर मी राजकीय संन्यास घेईल, असे उदय सामंत म्हणाले.

उदय सामंत म्हणाले, मी कुणालाही पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला नाही. विजयादशमी दिवशी झालेल्या प्रकारानंतर माझे कोणत्याही मुस्लिम बांधवांशी बोलणे झाले असेल, तर मी राजकीय संन्यास घेईन. माझा सीडीआर जरी कोणाशी बोलण्याबाबत सापडला तरीही मी संन्यास घेईन. याप्रकरणी मोहन भागवतांशी बोललो असून संघाच्या लोकांनी मला कुठेही बोलवावे, मी माझी बाजू मांडेन. मी मुस्लिम बांधवांना एका बाजुने सहकार्य करतो, असे उगाच पसरवू नका, असे आवाहनही सामंत यांनी केले.

वक्फ बोर्ड रद्द करायचे असेल तर फडणवीसांकडे घेऊन जाईन

उदय सामंत यांनी यावेळी रत्नागिरीतील वक्फ बोर्ड कार्यालयावरही भाष्य केले. रत्नागिरीतील वक्फ बोर्ड मी मंजूर केले नाही. ते २३ मार्च २०२३ रोजी मंजूर झाले होते. ही मंजुरी महाराष्ट्र शासनाने दिली आहे. माझ्या खात्याचा यात काहीही संबंध नाही. राजमाता गोमाता करण्यात माझा खारीचा वाटा आहे. वक्फ बोर्ड रद्द करण्यासाठी कोणाला यायचे असेल तर मी त्यांना फडणवीसांकडे घेऊन जाईल, असे स्पष्टीकरण सामंत यांनी दिले आहे.

नेमके प्रकरण काय? कणकवली येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने विजयादशमीच्या पूर्वसंध्येला पथसंचलन काढण्यात आले होते. मुस्लिम समाजातील काही समाज कंटकांनी या संचलनात घुसून घोषणाबाजी केली होती. हे पथसंचलन अडवण्याचा प्रयत्न केला होता. यामुळे कणकवलीसह परिसरात संवेदनशील आणि तणावपूर्ण वातावरण झाले होते. या प्रकरणी माजी नगरसेवक मुसा काझी यांच्यासह सुमारे १०० जणांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल झाली आहे. तसेच समाजकंटकांवर कारवाईची मागणी करणाऱ्या ४० जणांविरोधातही तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी मतमोजणी करावी : प्रकाश आंबेडकर

### ईव्हीएमवरील आरोप टाळण्यासाठी वंचितचा निवडणूक आयोगाला सल्ला



**मुंबई :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाला आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. मात्र ही मतमोजणी मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

यासंदर्भात निवडणूक आयोगाला लेखी निवेदन देखील देणार असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. ते आज सकाळी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, महाराष्ट्र हे शांतताप्रिय राज्य असल्याचे निवडणूक आयोगाने मान्य केले आहे. त्यामुळे त्यांनी एका टप्प्यात निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाचा हा निर्णय चांगला असून सर्वच राज्यांमध्ये अशाप्रकारचा निर्णय घ्यायला हवा. मात्र निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी लगेच मतमोजणी व्हावी, अशी आमची मागणी आहे. निवडणूक आयोगाने या मागणीवर विचार करावा. यापूर्वी बॅलेट पेपरद्वारे मतदान व्हायचे तेव्हा दुसऱ्याच दिवशी मतमोजणी केली जायची. मला वाटते की, ईव्हीएम हे मशीन आहे त्यामुळे लगेच मतमोजणी करता येते. दुसऱ्या दिवशी मतमोजणी झाल्यास हरियाणा निवडणुकीवेळी झालेले आरोप पुन्हा होणार नाहीत. याबाबत निवडणूक आयोगाला आम्ही लेखी पत्र देखील पाठवणार आहोत, असेही प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

क्रीमीलेयर जीआर केले भाष्य

क्रिमीलेयर जीआरवर बोलताना आंबेडकर म्हणाले, सुप्रीम कोर्टाने वर्गीकरण आणि क्रिमीलेयर बाबत जो निर्णय घेतला होता, तो काय होता? त्यावर पॉलिसी बनू शकते की, संसद यावर केवळ निर्णय घेऊ शकते. तर यावर फक्त संसदच निर्णय घेईल आणि हा मुद्दा कोर्टात आहे. मात्र त्याआधीच या राज्य सरकारनेच त्याची अंमलबजावणी सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि जीआरही जारी केला, हे कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

ओबीसी समाज भाजपला मत देणार नाही प्रकाश आंबेडकर

आंबेडकर म्हणाले, ओबीसी समाज भाजपला मतदान करेल, असे मला वाटत नाही. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावेळीही आमच्या पक्षाने भूमिका जाहीर केली होती. आम्ही ओबीसींच्या समर्थनासाठी पुढे आलो होतो आणि आरक्षण बचावासाठी उभे राहिले होतो. त्यामुळे भाजपने कितीही प्रयत्न केला तरी ओबीसी समाज त्यांना मतदान करणार नाही, असा विश्वास प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला.

**आयुष्यात जो धडा रिकामी पोट, रिकामा खिसा आणि वाईट वेळ शिकवते ना तो धडा कोणती युनिव्हर्सिटी किंवा शाळा सुद्धा शिकवू शकत नाही.**

## आंतरवाली सराटीत तोबा गर्दी मनोज जरांगेंकडे ८०० इच्छुकांचे अर्ज



**जालना :** मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या माध्यमातून राज्याच्या राजकीय पटलावर स्वतःच्या ताकदीचा ठसा उमटवणाऱ्या मनोज जरांगे पाटलांनी विधानसभा निवडणूक लढवण्याचे संकेत दिलेत. यासाठी राज्यभरातून त्यांच्याकडे ८०० हून अधिक इच्छुक उमेदवारांचे अर्ज आलेत. यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मराठा आंदोलनाचा केंद्रबिंदू ठरलेल्या आंतरवाली सराटीत मराठा समाजाच्या इच्छुक उमेदवारांची तोबा गर्दी झाली आहे.

२८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी एका टप्प्यात निवडणूक होत आहे. त्यानंतर २३ तारखेला मतमोजणी होऊन निकाल जाहीर होतील. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे यांनी एका मराठी वृत्तपत्राशी बोलताना आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आपल्याकडे ८०० हून अधिक इच्छुक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्याची माहिती दिली आहे.

८०० इच्छुकांचे अर्ज दाखल

इच्छुक उमेदवारांशी मी उद्यापासून संवाद साधेल. त्यानंतर २० ऑक्टोबर रोजी निवडणूक लढवायची की सत्ताधाऱ्यांचे आमदार पाडायचे याबाबतचा निर्णय घेतला जाईल. तूर्त आमच्याकडे ८०० हून अधिक इच्छुकांचे इर्ज प्राप्त झालेत, अशी माहिती मनोज जरांगे यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

उल्लेखनीय बाब म्हणजे लोकसभा निवडणुकीपूर्वी अनेक नेत्यांनी सत्ताधारी भाजपमध्ये प्रवेश केला होता. पण लोकसभा निवडणुकीत भाजपची हाराकिरी झाल्यामुळे ते आपल्या निर्णयावर फेरविचार करत आहेत.

ही इच्छुक राजकीय मंडळी पुन्हा एकदा महाविकास आघाडीमध्ये परतण्याच्या दिशेने विचार करत आहेत. विशेषतः या नेत्यांनी उमेदवारीच्या आशेने जरांगे यांच्या आंतरवाली सराटीतही गर्दी केली आहे. शिवसेनेची दोन शकले झाल्यानंतर मराठवाड्यातील अब्दुल सत्तार, संदीपान भुमरे, प्रदीप जैस्वाल, संजय शिरसाट, ज्ञानेश्वर चौगुले, बालाजी कल्याणकर, संतोष बांगर, प्राध्यापक रमेश बोरनारे, तानाजी सावंत या ९ आमदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्विकारले. त्यामुळे या आमदारांच्या मतदारसंघात पक्षसंघटना मजबूत करण्यासह नवे उमेदवार उभे करण्यावर उद्धव ठाकरे यांना जोर द्यावा लागणार आहे.

त्यानुसार उद्धव ठाकरे यांनी पैठणमध्ये राष्ट्रवादीतून दत्ता गोर्डे, पैठण येथीली संत एकनाथ साखर कारखान्याचे अध्यक्ष सचिन घायाळ, औरंगाबाद पश्चिम मतदारसंघात विद्यमान आमदार संजय शिरसाट यांच्याविरोधात राजू शिंदे, वैजापूरमध्ये प्रा. बोरनारे यांच्याविरोधात दिनेश परदेशी यांना पक्षात प्रवेश दिला आहे. यापूर्वी या मतदारसंघात भाऊसाहेब चिकटगावकर ठाकरे गटात प्रवेश केला होता.

पण परदेशी यांच्या प्रवेशामुळे त्यांनी पुन्हा ठाकरेंना सोडचिठ्ठी दिली. सिल्लोडमध्ये मात्र अद्याप उद्धव ठाकरे यांना अद्याप नवा भिडू मिळवता आला नाही. दुसरीकडे, निवडणुकीच्या तोंडावर बीड, परभणी, धाराशिव, लातूर, जालना या मतदारसंघातून शरद पवारांना भेटून येणाऱ्यांची संख्याही वाढली आहे.

विधानसभेला लोकसभेहून दुप्पट ताकद दाखवणार -जरांगे

मनोज जरांगे यांनी मंगळवारी महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत धडा शिकवण्याचे संकेत दिले होते. सत्ता असल्यामुळे आरक्षण देणे सरकारच्या हातात होते. आता विधानसभेचे मतदान आमच्या हातात आहे. तुम्हाला सत्तेत येऊ द्यायचे की नाही हे आमच्या हातात आहे. सरकारने कोणतीही मागणी नसताना १५ जातींचा ओबीसींमध्ये समावेश केला. पण मराठा समाजाच्या मागणीकडे दुर्लक्ष केले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणत होते की मराठा समाजाचा समावेश ओबीसीमध्ये करायचा असेल तर महाविकास आघाडीकडून तसे लिहून घ्या. आता १५ जाती ओबीसींमध्ये घेतल्या तेव्हा त्यांनी तसे लिहून घेतले होते का? आपण लोकसभेच्या वेळी जेवढी ताकद दाखविली होती, त्याच्या दुप्पट विधानसभेच्या निवडणुकीत दाखवू, असे मनोज जरांगे महायुतीला इशारा देताना म्हणाले होते.

## महाविकास आघाडीच गुजरातची ब्रँड ॲम्बेसेडर - देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** राज्यातील महाविकास आघाडीतील नेते गुजरात राज्याचे ब्रँड ॲम्बेसेडर असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. सध्या देशात महाराष्ट्र नंबर एकचे राज्य असून देखील महाविकास आघाडीचे नेते गुजरातचे गुणगान गात आहेत.

या माध्यमातून ते महाराष्ट्राला कमी लेखत असल्याचा आरोप त्यांनी केला. इतकेच नाही तर गृहमंत्रालयावर होत असलेल्या आरोपांवर देखील त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ज्यांचा गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेला, तेच आता आरोप करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

राज्यातील स्थगिती सरकार गेल्यानंतर आता राज्यात गतिशील सरकार आले असल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. आमच्यासाठी निवडणुकीचा शंखानाद झाला आहे. मात्र विरोधकांसाठी ते ऐलान असल्याचा टोला देखील फडणवीस यांनी लगावला आहे. आम्ही परिवर्तन करणाऱ्या योजना आणल्या असल्याचा दावा देखील फडणवीस यांनी केला आहे.

शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जेची योजना आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसा वीज उपलब्ध करून देणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. ही केवळ घोषणा नाही. तर याचे प्रत्यक्ष काम जमिनीवर सुरू केले असल्याचे देखील ते म्हणाले. साडेआठ रुपयांना पडणारी वीज आता तीन रुपयाला पडणार असल्याचे देखील फडणवीस यांनी म्हटले आहे. यातून राज्य सरकारचा मोठ्या प्रमाणात पैसा देखील वाचणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे.

राज्यातील कायदा व्यवस्थे संदर्भात देखील गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राज्य सरकारने कोणतेही घटना घडल्यानंतर तात्काळ कारवाई केली असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. मात्र, ज्यांचे गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेले. ते आता राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर बोलत असल्याचा खोचक टोला देखील त्यांनी लगावला. यावेळी त्यांनी राज्यात महाविकास आघाडी सरकारच्या म्हणजेच उद्धव ठाकरे सरकारच्या काळात घडलेल्या अनेक गुन्हेगारी संदर्भातील घटनांचा उल्लेख केला. आता देखील काही घटना घडल्या आहेत. मात्र तात्काळ कारवाई केली गेली असल्याचा दावा त्यांनी केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ ऑक्टोबर २०२४


## महाराष्ट्रात स्वबळावर निवणूक लढण्याचा मायावती यांचा नारा



**मुंबई** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची काल घोषणा झाली असून त्यासोबतच राजकीय पक्षांनीही जय्यत तयारी सुरू केली आहे. दरम्यान, मायावतींच्या बहुजन समाज पक्षानेही मोठी घोषणा केली आहे. बसपा महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये स्वबळावर निवडणूक लढवेल, म्हणजेच महायुती किंवा महाआघाडीत सामील होणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

बसप प्रमुख मायावती यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून ही माहिती दिली आहे. त्यांनी लिहिले की, "बसपा या दोन राज्यांमध्ये (महाराष्ट्र आणि झारखंड) स्वबळावर निवडणूक लढवणार आहे आणि प्रयत्न करेल की तेथील लोक इकडे-तिकडे भटकू नयेत, ते पूर्णपणे बसपामध्ये सामील होतील आणि सर्वात जास्त आत्म सन्मान आणि स्वाभिमान कारवा मध्ये सामील होतील. पूज्यनीय बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांचा सारथी बनून सत्ताधारी होण्यासाठी आपले प्रयत्न चालू ठेवणार आहेत. तसेच बसपा या दोन राज्यात स्वबळावर निवडणूक लढवणार आहे.

मायावतींनी निवडणूक आयोगाला सांगितली जबाबदारी

निष्पक्ष निवडणुकीच्या आशेने, बसपा प्रमुखांनी पोस्टमध्ये लिहिले की, "भारतीय निवडणूक आयोगाची महाराष्ट्र आणि झारखंड राज्यांच्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखांची घोषणा स्वागतार्ह आहे. निवडणुका कमी वेळात आणि स्वच्छपणे व्हाव्यात. जेवढे शक्य असेल, ते म्हणजे मनी पॉवर, मसल पॉवर इत्यादींचा शाप. तो जितका मोकळा असेल तितकी त्याची संपूर्ण जबाबदारी निवडणूक आयोगावर असते.

२०१९ च्या महाराष्ट्र निवडणुकीत बसपाचा विक्रम

२०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत बसपने २८८ पैकी २६२ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. मात्र, त्याचा विशेष परिणाम होऊ शकला नाही. पक्षाला एकही जागा मिळाली नाही. त्याचवेळी मतदानाची टक्केवारी केवळ ०.९१ टक्के होती. निवडणुकीपूर्वी त्यांनी महाराष्ट्रात जाहीर सभाही घेतल्या होत्या. त्याच वेळी, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत बसपने २८१ जागांवर उमेदवारांना तिकीट दिले होते. त्या निवडणुकीतही मायावतींना जागा जिंकता आल्या नाहीत. मात्र, काँग्रेससह अन्य पक्षांची मते आपल्याकडे वळवण्यात त्यांना यश आले होते. बसपाला विदर्भात ७.९ टक्के मते मिळाली होती.

## परतीच्या पावसाने गांधारी आणि शिवना नदीला मोठा पूर



**कन्नड (अक्षय चव्हाण)** : तालुक्यात सोमवारी मध्यरात्री झालेल्या परतीच्या पावसाने गांधारी आणि शिवना नदीला मोठा पूर आला. त्यामुळे तालुक्यातील सर्वात मोठा असलेला शिवना टाकळी प्रकल्प सोमवारी (दि. १४) सकाळी ११ वाजता ओव्हरफ्लो झाला. त्यानंतर प्रकल्पाचे १ आणि ५ क्रमांकाचे दोन दरवाजे १५ सेंटीमिटर उघडण्यात आले.

या दोन्ही दरवाजातून ११४९ क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू आहे.यंदा पावसाचा अंदाज घेणे कठीण झाले आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी समाधानकारक पाऊस पडला आहे. त्यामुळे अनेक प्रकल्पात पाणी चांगले आहे. तर तालुक्यातील अर्धे प्रकल्प आजही कोरडेठाक आहे.

पावसाळा संपत आलेला असतानाही तालुक्यातील जे प्रकल्प तहानलेले आहेत. त्यावर अवलंबून असलेल्या नागरिकांना परतीच्या पावसाची आजही आस आहे. रविवारी रात्री आलेल्या परतीच्या पावसामुळे शिवना आणि गांधारी नदीला मोठा पूर आल्याने शिवना-टाकळी हा प्रकल्प काठोकाठ भरला आहे.

आतापर्यंत ६ वेळा ओव्हरफ्लोसन २००५ ला शिवना टाकळी प्रकल्प पुर्ण झाला. प्रकल्प पुर्ण झाल्यापासून या २० वर्षात हा शिवना टाकळी प्रकल्प ६ वेळेस ओव्हरफ्लो झाला आहे. सन २०२०, २१, २२ या तीन वर्षी सलग शिवना टाकळी पूर्णपणे भरला होता. प्रकल्पात जोपर्यंत वरील पाणीसाठ्यातून पाण्याची आवक सुरू राहिल तोपर्यंत १ आणि ५ दरवाजातून पाण्याचा विसर्ग ११४९ क्युसेसने सुरू राहणार आहे. - अशपाक शेख, प्रकल्प अधिकारी, शिवना टाकळी.

## मी स्वत: मराठा समाजाला आरक्षण देणार - एकनाथ शिंदे

**मुंबई** : राज्यातील मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरुन मनोज जरांगे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांच्या भूमिकेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली असून मराठा समाजाला आम्ही अन् मी स्वत: आरक्षण देणार आहे.

ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण देणार, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. महायुतीच्या वतीने बुधवारी संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आम्ही जे बोलतो ते करतो. मी स्वत: ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण देणार आहे. दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करुन मराठा समाजाला आरक्षण देण्याची शपथ घेतली. त्यानंतर विधानसभेचे अधिवेशन बोलावून मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. यापूर्वीही देवेंद्र फडणवीस यांनी देखील आरक्षण दिले होते, पण ते आरक्षण कुणी घालवले, त्यांना आरक्षण कोर्टात टिकवता आले नाही. आता देखील आम्ही दिलेले आरक्षण रद्द करण्यासाठी याचिका दाखल होत आहेत. याचिका दाखल करणारे कोण आहेत, ते एकदा पहा, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवरही निशाणा साधला.

## आमच्या त्यागामुळेच राज्याचे मुख्यमंत्रीपद अन् महायुतीची सत्ता आली - भरत गोगावले



**रायगड** : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपने त्यांच्यासाठी केलेल्या त्यागाची आठवण करून दिली. भाजपने त्याग केल्यामुळेच ते मुख्यमंत्री झाल्याची बाब त्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर आता शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी आम्ही केलेल्या त्यागामुळेच राज्यात महायुतीचे सरकार आल्याचा दावा करत एकप्रकारे आपणही भाजपसाठी त्याग केल्याचे ठणकावून सांगितले आहे.

शिवसेनेतील फुटीनंतर राज्यात देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याचे सांगितले जात होते. पण ऐनवेळी भाजपने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली होती. अमित शहा यांनी एका बैठकीत शिंदे यांना या घटनाक्रमाची आठवण करून देत त्यांना भाजपसाठी मन मोठे करण्याची विनंती केली होती. सूत्रांच्या माहितीनुसार, अमित शहा एका बैठकीत शिंदेंना उद्देशून म्हणाले की, शिंदेजी, या देशात पंतप्रधान, मुख्यमंत्री व तहसीलदार अशी काही महत्त्वाची पदे आहेत. बाकी गृहमंत्र्यांसह सर्वच पदे केवळ व्यवस्था आहेत. कामे पूर्ण होण्यासाठी केलेली ही व्यवस्था आहे आम्ही तुम्हाला मुख्यमंत्रीपद दिले. तुमच्यासाठी आमच्या माणसांनी त्याग केला. पण आता जागावाटपात तुम्हाला आपल्या मित्रपक्षांना म्हणजे भाजपला झुकते माप द्यावे लागेल.

आमच्या त्यागामुळेच सरकार आले

अमित शहा यांच्या या विधानानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही त्याची री ओढली. यावरून महायुतीत बेबनाव निर्माण होत असल्याची चर्चा असतानाच देवेंद्र फडणवीस यांनी अमित शहा असे काहीही बोलले नसल्याचा दावा केला. पण त्यानंतरही शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी भाजपला आपल्यामुळेच राज्यात महायुतीचे सरकार आल्याची आठवण करून दिली आहे.

भरत गोगावले म्हणाले, त्यांनी जसा त्याग केला, तसा आम्ही देखील त्याग केला. किंबहुना आम्ही केलेल्या त्यागामुळेच आम्हाला मुख्यमंत्री पद मिळाले. राज्यात महायुतीची सत्ता आली. प्रत्येकाची भूमिका योग्य आहे. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आणायची असेल तर सर्वांना मिळून मिसळून काम करावे लागेल.

आम्ही बोलणार नाही, पण कुणी बोलले तर सोडणार नाही

श्रीवर्धन मतदारसंघातील महायुतीच्या संघर्षावर बोलताना भरत गोगावले म्हणाले की, आम्ही ठरवले आहे की, रायगडच्या सातही जागा महायुतीच्याच आहेत. त्यासाठी आपल्याला आपापले कार्यकर्ते व पदाधिकारी सांभाळावे लागतील. आम्ही लोकसभा निवडणुकीत जसे त्यांना सांभाळले तसे त्यांना यावेळीही सांभाळावे लागेल. काही अडचणी आल्यास आम्ही त्या मिटवू. श्रीवर्धनची जागा आम्ही आदिती तटकरे यांनाच आम्ही देऊ. आम्ही त्यांच्याविरुद्ध अद्यापही काही बोललो नाही. पण त्यांनी काही केले तर आम्ही प्रत्युत्तर देऊ.

जनता हेच माझे व्हिजन

भरत गोगावले पुढे म्हणाले, माझ्या मतदारसंघातील जनता हेच माझे व्हिजन आहे. येथील एकही गाव, एकही वाडी, एकही वस्ती विकासापासून वंचित राहणार नाही. आम्ही लाभाच्या अनेक योजना थेट जनतेपर्यंत पोहोचवल्या. विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजनेचा चांगला परिणाम होईल. महाविकास आघाडीने कितीही टीका केली तरी आमचे कार्यकर्ते त्याचा सामना करतील.

## बीजेपी शिंदेंना एकेका जागेसाठी रडवणार — अंबादास दानवे

**मुंबई** : राज्य विधानसभा निवडणुकीत भाजप शिंदे गटाला एकेका जागेसाठी रडवेल, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी २८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला. त्यानुसार राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभेचा फड रंगणार असून, त्यानंतर २३ तारखेला निकाल जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुती व महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाची चर्चा रंगात आली आहे. त्यातच विधानपरिषदेतील जागावाटपाच्या मुद्यावरून शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी शिंदे गटाला डिवचले आहे.

अंबादास दानवे यांनी महायुतीमधील जागावाटपाच्या संघर्षाकडे अंगुलिनिर्देश करून भाजप एकेका जागेसाठी शिंदे गटाला रडवणार असल्याचा दावा केला आहे. आताच दिल्लीच्या वजीराने मिंधे आणि त्यांच्या गटाला 'त्याग' शब्दाचे महत्व सांगितले म्हणे! खेळ सुरू झाला आहे. आता तत्व वगैरे सांगून शिंदे गटाच्या जागांची प्राथमिक छाटणी होईल. मग येतील सर्व्हे, मग येतील उमेदवार बदलायच्या अटी. लक्षात ठेवा, शिंदे गटाला भाजप एक-एक जागेसाठी रडवणार, अशा शब्दात अंबादास दानवे यांनी महायुतीतील जागा वाटप आणि त्यात शिंदेंच्या शिवसेनेची काय अवस्था असेल? यावर भाष्य केले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे अंबादास दानवे यांनी निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेनंतर २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीवरून देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या पहाटेच्या शपथविधीचा एक फोटो पोस्ट केला होता. त्यावरूनही बरीच चर्चा रंगली होती. ते म्हणाले होते, हा फोटो आठवतोय ना? या पहाटेच्या शपथविधीची तारीख होती २३ नोव्हेंबर २०१९. आता २३ नोव्हेंबर २०२४ रोजीच महाराष्ट्राची जनता आणि महाविकास आघाडी यांचा निकाल लावणार आहे!

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ ऑक्टोबर २०२४


# म.सा.प.च्या मतदारांनी ठालेंच्यापालखीचे अजन्म भोई बनू नये!



म.सा.प.कार्यकारी मंडळाची निवडणूक स्वतंत्र बुद्धीच्या साहित्यिक-विचारवंताची आहे. तीन हजार सत्तर (३०७०) म.सा.प.चे विवेकी अजीव सभासद त्यासाठी मताधिकार बजावणार आहेत, हे खरे असले तरीही यातील तीनशे अठ्ठावीस मतदारांना स्वतः मतदार असल्याचे माहीतही नाही. यादीत स्वत:चे नाव पाहून त्यांना आश्चर्य देखील वाटत नाही.मला माहीत असलेल्या शहासष्ठ (६६) अजीव सभासदांचे नावच मतदार यादीत नाही.

मात्र मृत्यू पावलेल्या मतदारांची नावे यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत.माझ्यासहीत काही मतदारांचे नांव यादीत दोनवेळा आले आहे. मतदार यादीतील अनेकांचे पत्ते अपूर्ण आहेत.बोगस मतदान सहज करुन घेता यावे यासाठी अनेकांचे पत्ते एकत्रच(द्वारा) आहेत. मतदान गुप्त पध्दतीनेच करुन घ्यावे असा संविधानाचा दंडक असतांना देखील म.सा.प.चे मतदार कोरी मतपत्रिका कुणाच्यातरी भितीपोटी उमेदवारांच्या हाती सोपवतात.

हे पस्तीस-चाळीस वर्षापासूनचे गौडबंगाल, आहे तसेच चालू आहे.तीन हजार सत्तर अजीव सभासद असलेले 'प्रतिष्ठान' हे नियतकालिक नियमितपणे प्रसिद्ध केले जात नाही. केले जात असेल तर अजीव सभादापर्यंत ते नियमित पोचत नाही. शासनाचे अनुदान लाटण्याची चटक लागलेल्या संस्था संवर्धन पैनल प्रमुखांना ही निवडणूक गुणवत्तेची न् वाटता भाटगिरी करणाऱ्यांची वाटते.

विवेकी मतदार त्यांना पाटलकीचे गुलाम वाटतात.'माझी मराठी मराठाच मीही' या बोध वाक्याचा वाच्यार्थ घेऊन ते निवडणूक लढवत आहेत.काही विकावू पत्रकारांना हाताशी धरुन या निवडणूकीला राजकीय मुलामा देण्याचा प्रयत्न केला जातोय. विवेकी वाचक-मतदारांनी अशा भुलथापांना बळी पडू नये. व्यक्तीपूजक न बनता, व्यक्तिस्वातंत्र्याचा अवलंबन करुन मताधिकाराचा वापर करावा.

कोरी मतपत्रिका कोणत्याही उमेदवाराच्या हाती सोपवू नये. ती आपण स्वतः पोस्टाने पाठवावी. संविधानाने दिलेल्या मताधिकाराचा बाजार मांडून, बाजार बुणग्याना निवडून दिले जाते. मताधिकार गुप्तपणे बजावला गेला पाहिजे हा संकेत असतांनाही, म.सा.प.च्या निवडणू कीमध्ये मतपत्रिका हातोहात गोळा करण्याचा उद्योग, पस्तीस-चाळीस वर्षापासून बिनदिक्कतपणे चालतो.

त्यामुळे एकच अध्यक्ष वर्षानुवर्षे निवडला जात आहे.प्राचार्य कौतिकराव ठाले यांच्या अध्यक्ष पदासाठीच म.सा.प.कार्यकारी मंडळाची निवडणूक,मतपत्रिका हातोहाती जमा करुन होत आलेली आहे.याला आजवर कुणीही आव्हान दिलेले नव्हते.

परंतू आज परिवर्तन मंचाचे आव्हान ओलांडूनच संस्थासंवर्धनच्या उमेदवारांना पुढे जावे लागेल,आणि ते एवढे सोपे नाही.प्रा.डॉ.सिद्धोधन कांबळे, डॉ.मोहन सौदर्य, डॉ.प्रतिभा अहिरे, बबनराव मोरे हे उमेदवार आपल्याला चारीमुंड्या चित करतील या भितीपोटी, कौतुकरावांनी आर.एस्.एस्.च्या दांड्या-झेंड्याचा आधार घेत मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केला आहे.

स्वत:ला वाचवण्यासाठीच हा अपप्रचार केला जात आहे, हे कुणाच्याही सहज लक्षात येईल.म्हणून स्वावलंबी मतदार त्यांचे हे षडयंत्र कदापीही यशस्वी होऊ देणार नाहीत,याचा विश्वास परिवर्तन मंचाला आहे. म.सा.प.ची निवडणूक ना संघाविरुध्द आहे, ना आंबेडकरवादासाठी आहे,ना गांधीवाद्या विरुध्द आहे, ना ती साम्यवादासाठी आहे! ती साहित्य क्षेत्रातील ठेकेदारी व मक्तेदारी संपविण्यासाठी आहे.

इथे दलित साहित्य विरुद्ध ग्रामीण साहित्य असाही वाद नाही.१९९० नंतरच्या दशकात लेखन करणाऱ्या विविध वाङमय प्रवाहातील साहित्यिकांनी एकत्र येऊन,म.सा.प.च्या ठेकेदारांविरुध्द पुकारलेले हे ऐतिहासिक वाङमयीन बंड आहे. मग साहित्य क्षेत्रातील निवडणूकीला राजकीय रंग का दिला जातोय? हा प्रश्न शिल्लक राहतो.

'माझी मराठी मराठाच मीही' याचा वाच्यार्थ सांगून मतदारांची दिशाभ्रमित केली जात आहे. डॉ.सिध्दोधन कांबळे, डॉ.सर्जेराव जिगे, डॉ.मोहन सौंदर्य यांची विचारधारा,यांचे राजकीय हितसंबध आजच शोधून काढण्याची गरज ठाले समर्थकांना का वाटावी?मुळात म.सा.प.ची निवडणूक राजकीय विचारधारेवर किंवा वाङमयीन प्रवाहावर लढवली जात नाही.

आम्ही सर्वजन मराठवाडा साहित्य परिषदेचे अजीव सभासद आहोत.जसा आम्हाला मत देण्याचा अधिकार आहे,तसाच म.सा.प.च्या कार्यकारी मंडळाची निवडणूक लढवण्याचा अधिकारही आम्हाला घटनेने दिलेला आहे.

सभासद नोंदणी करतांना कोण संघाचा,कोण आंबेडकरवादी,कोण दलित,कोण गांधीवादी असा विचार केला जातो का? तशी तरतूद म.सा.प.च्या घटनेत आहे का? डॉ.सिद्धोधन कांबळे या विचाराचे,डॉ.सर्जेराव जिगे त्या विचाराचे म्हणून आमचे आजिव सभासदत्व त्याच वेळी का रद्द केले गेले नाही? म.सा.प.ही कुणाच्या घरची जहागीर नाही.अ.भा.मराठी साहित्य संमेलनाची दिशा ठरवणारी एक सार्वजनिक साहित्य संस्था आहे.

एखादी वैयक्तिक साहित्य संस्था स्थापन करुन तुम्ही त्याचे अजन्म अध्यक्ष राहा,त्याला कुणाचीही विरोध असणार नाही. परंतू सार्वजनिक संस्थाना स्वतःची जहागीर समजणे,हे स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षानंतरही संपणार नसेल तर यापेक्षा मोठी गुलामगीरी कोणती?उमेदवार कोणत्या विचारांचा आहे,त्याची जात कोणती आहे? याच्याशी म.सा.प.च्या निवडणूकीचा काही एक संबंध नाही.

३०७० मतदारापैकी व ३७ उमेदवारांपैकी सर्वजनच वेगवेगळ्या विचारप्रवाहाचे, जात, पंथ, धर्माचे, सांस्कृतिक परंपरांचे प्रतिनिधित्व करतात, म्हणून त्याला आजच अधोरेखित करणे गरजेचे आहे का? लोकशाही व्यवस्थेत एकच व्यक्ती वर्षानुवर्ष कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष राहतो,त्याविरुद्ध आजवर कुणीही आवाज उठवलेला नाही.

आज आम्ही पंधरा उमेदवारांनी एकत्र येऊन, म.सा.प. मध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी विद्रोह केला, तर लगेच आमची जात, धर्म, विचारप्रवाह अधोरेखित केला जातोय हा आमच्या आत्मसन्मानावर केलेला आघात नव्हे काय?या पाठीमागचे षडयंत्र सुज्ञ व विवेकी मतदारांनी ओळखले पाहिजे.अन्यथा पिंडीवर बसलेल्या विंचवाचा डंख आपल्याला कायमचा सोसावा लागेल.


**प्रा. डॉ. सिद्धोधन कांबळे**
तक्षक, गांधीनगर,
बिलोली. जि.नादेड-४३१७१०
मो.क्र. :९४२०६७१७५०



Om Shanti Bahuuddeshiya Shikshan Sanstha's

**GURU MISHRI AYURVED COLLEGE**

Matoshri Badambai Motilalji Desarda Ayurved Hospital

**BAMS 60 Seats College Code 3393**

**Preference Filling Started for CAP Round 2!**

**Shape Your Future in Medical Education**

**Guru Mishri Homoeopathic (4346)** College Code

BHMS 100 Seats MD(Hom) 51 Seats PHD 18 Seats

**Guru Mishri Pharmacy College (2642)** DTE Code

D-Pharmacy 60 Seats



- Dr. Desarda's Families 43 years Experience in Medical education
- Hostel: Boy's & Girls with in campus Mess facilities & 24 Hrs round clock security
- Well established Hospital for Hands-on Training
- Easily Accessible Campus
- Result: One of the best in Maharashtra.

Approved by NCISM Delhi, Government of Maharashtra and Affiliated to MUHS,Nashik

CALL US NOW!
+91 98237 28282
+91 98340 45126

www.gurumishriamc.in www.gurumishrihmc.edu.in

Shelgaon, Tq. Badnapur, Dist. Jalna 431 202 (M.S)